# कोविड –१९ भरतीप्रक्रिया

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा नाशिक

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नाशिक जिल्हयासाठी **COVID - 19** या साथरोगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने नाशिक जिल्हयातील कोविड रुग्णालयांसाठीच्या कोविड –१९ अंतर्गत (CCC/DCHC/DCH) यांकरिता पदभरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करार पदध्तीने मानधन तत्वावर पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर रुग्णालये मनपा नाशिक, मनपा मालेगाव व नाशिक ग्रामीण भागात स्थापन करण्यात आलेली आहेत.

**RESERVATION CHART OF VACANT POST COVID-19 RECRUITMENT**

| S. N. | POST NAME | EDUCATIONAL QUALIFICATION | SALARY | Total POST | RESERVATIONS | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | SC | ST | VJ | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
| 1 | Physician | MD Medicine | 75000 +performance | 5 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 |
| 2 | Medical Officer MBBS | MBBS | 60000 | 24 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 5 | 3 | 2 | 6 |
| 3 | Medical Officer AYUSH | BAMS/BUMS | 30000 | 139 | 18 | 10 | 4 | 3 | 5 | 3 | 3 | 26 | 18 | 14 | 35 |
| 4 | Staff Nurse | BSc Nursing / GNM | 20000 | 324 | 42 | 23 | 10 | 8 | 11 | 7 | 6 | 62 | 42 | 32 | 81 |
| 5 | X-Ray Technician | Retired X-ray Technician | 17000 | 9 | 1 | 1 | 1 | | | | 0 | 2 | 1 | 1 | 2 |
| 6 | ECG Technician | B.sc with physics/ Chemistry/ Biology & Experience of ECG Technician at least 1 year | 17000 | 16 | 2 | 1 | 1 | | 1 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 4 |
| 7 | Lab Technician | BSc DMLT from recognized institute | 17000 | 42 | 5 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 8 | 5 | 4 | 11 |
| 8 | Pharmacist | D. Pharm/ B. Pharm | 17000 | 50 | 7 | 4 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 9 | 6 | 5 | 13 |
| 9 | Hospital Manager | MBA (Health Care/Health Administration) /MPH/MHA | 35000 | 20 | 3 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 4 | 3 | 2 | 5 |

Scanned with CamScanner

| S. N. | POST NAME | EDUCATIONAL QUALIFICATION | SALARY | Total POST | RESERVATIONS | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | SC | ST | VJ | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
| 10 | Data Entry Operator | Any graduate, English Typing 40 wpm, Marathi Typing 30 wpm & MS-CIT. | 17000 | 22 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 3 | 2 | 5 |

**अटी व शर्ती:-**

१) इच्छुक उमेदवारांनी दि.१९/०६/२०२० रात्री १२:०० वा. या पर्यंत ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या लिंकवर विहीत नमुन्यातील अर्ज व जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रे सादर करावीत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज पोष्टाद्वारे, कुरियर अथवा प्रत्यक्षात (By Hand) स्विकारण्यात येणार नाही.

२) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही. कोरोना विषाणु (COVID - 19) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी COVID Care Centre (CCC), Dedicated COVID Health Centre (DCHC), Dedicated COVID Hospital (DCH) या संस्थामध्ये पदस्थापना देण्यात येईल. सदर रुग्णालये मनपा नाशिक,मनपा मालेगाव व नाशिक ग्रामीण भागात स्थापन करण्यात आलेली आहे त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीचे ठिकाण या संस्थापैकी सदर भरतीत सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी यांची प्राधान्यक्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

३) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास COVID - 19 या साथरोगाच्या व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हता धारक शासकीय सेवेतून सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहातील.

४) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून त्यांचा कालावधी ३ महिने अथवा कोविड साथरोग परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत यापैकी नजिकच्या कालावधीकरीता भरण्यात येणार आहे अथवा त्याआधी सदरील पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

६) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. सेवानिवृत एम.बी.बी.एस व विशेपज्ञ वैदयकिय अधिकारी यांना ७० वर्षापर्यंत व इतर सेवानिवृत उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहिल.

७) लिंक द्वारे प्राप्त झालेल्या अर्जासोबत उमेदवारांनी ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या शेवटच्या वर्षामध्ये मिळालेल्या गुणावरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. सदर मेरीटलिस्ट शासनाच्या www.zpnashik.maharastra.gov.in, www.nrhm.maharashtra.gov.in व https://arogya.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरबाबत आक्षेप असल्यास त्याच दिवशी आपले आक्षेप dhozpnashik@gmail.com या ई - मेलवर नोंदवावे. तद्नंतर प्राप्त आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी. विहीत मुदतीत प्राप्त आक्षेपांचा विचार करुन अंतिम मेरीटलिस्ट उपरोक्त शासकीय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.मेरिटलिस्ट प्रमाणे व आरक्षणाप्रमाणे नियुक्ती आदेश ऑनलाईन, ई-मेल व वॉटसॲप वर पाठविण्यात येतील.

८) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून COVID-19 या साथरोगाच्या कालावधी साठी असल्याने, साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील COVID-19 उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

१०) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

Scanned with CamScanner

११) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

१२) सहसंचालक (अतांत्रिक) रा.आ.अ. मुंबई यांचे क्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यातयेईल.

१३) कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी.

१४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१५) मुलाखत होणार नसल्याने तसेच अर्ज दिलेल्या लिंकद्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवू नये.

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

१८) विहीत नमुन्यातील अर्जासोबत केवळ अर्ज केलेल्या पदाची आवश्यक शैक्षणिक अहर्तेची शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका अपलोड करावी. (टिपः सर्व वर्षांचे प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करु नये)

१९) उपरोक्त कागदपत्रे पी.डी.एफ. स्वरुपात प्राप्त होत असल्याने, ती स्पष्टपणे दिसतील याची काळजी घ्यावी. तसेच सदर प्राप्त अर्जावरुन मेरीट लिस्ट तयार होणार असल्याने, नियुक्ती नंतर कामावर रुजु होतांना आपण सादर केलेली माहिती आपल्या मुळ कागदपत्रांशी पडताळली जाणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास आपले नियुक्त आदेश रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२१) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ३ दिवसांचे आत नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

२२) पुरेसे उमेदवार न मिळाल्यास ती पदे भरेपर्यंत Walk-In-Interview पध्दतीने निवड करण्यात येईल.

२३) उपरोक्त आवश्यक कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्ज खालील दिलेल्या संकेतस्थळावर भरण्यात यावा.

| **संकेतस्थळ (लिंक)** |
| --- |
| **https://forms.gle/akM2sVyXLrawJsN97** |

२४) ऑनलाईन जाहीरातीसोबत दिलेला अर्जाचा नमुना वरील लिंक वर क्लिक करुन फक्त अर्ज व अंतीम वर्षाची गुणपत्रिका पाठवावी. इतर कोणतेही कागदपत्रे लिंक वर पाठवु नयेत.

२५) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी नाशिक व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखुन ठेवलेले आहेत.

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद नाशिक | जिल्हा शल्यचिकीस्तक<br>नाशिक | Leena M Bansod<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद नाशिक | जिल्हाधिकारी,<br>नाशिक |

Scanned with CamScanner